# University of Mumbai

Phone - 022 – 2265 2816
E-mail - dy.registrar.tau@fort.mu.ac.in
ar.tau@fort.mu.ac.in

Academic Appointments & Quality Assurance (AAQA)
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32


NAAC Accredited with A++

क्र.एएक्युए/आयसीडी/२०२१–२२/२६५

दि. ०८ डिसेंबर, २०२१

विषय :– लेखक, स्तंभलेखक, विचारवंत, राजनितीतज्ञ व भारत सरकारच्या विविध प्रशासन सेवेत काम केलेले अधिकारी श्री. ज्ञानेश्वर मुळे यांचे महाराष्ट्रातील विविध जिल्हयात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानाचे आयोजन करणे संदर्भात..

परिपत्रक :–

मुंबई विद्यापीठाचे सर्व संलग्नित/मान्यताप्राप्त महाविद्यालये/संस्थाचे प्राचार्य/संचालक, विविध विभागांचे संचालक/विभागप्रमुख, प्रभारी संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र (ग्रंथालय), प्राचार्य, सर ज.जी.स्थापत्यशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, आदर्श महाविद्यालय, तळेरे/अंबावडे, प्रभारी संचालक/समन्वयक रत्नागिरी, कल्याण आणि ठाणे उपपरिसर, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख यांना उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने असे कळविण्यात येते की, डॉ.धनराज माने, शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे– ४११ ००१ यांचे क्र. उशिसं/व्याख्यान/मवि–१/२०२१/१३८९२, दिनांक ०२ डिसेंबर, २०२१ रोजीचे पत्रान्वये श्री. ज्ञानेश्वर मुळे यांचे व्याख्यान महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयात आयोजित केले जावे असे कळविले आहे.

तसेच यु.पी.एस.सी.व एम.पी.एस.सी. साठी अभ्यास करणाऱ्या व परराष्ट्र सेवेत येऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना श्री. ज्ञानेश्वर मुळे यांच्या पुस्तकाचा व व्याख्यानाचा लाभ मिळण्यास्तव योग्य ती कार्यवाही महाविद्यालयीन स्तरावर करण्यात यावी व सदर कार्यवाही अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा असेही निर्देश देण्यात आले आहेत.(प्रत संलग्न)

तरी सर्व संबंधीतांनी याची नोंद घ्यावी व महाविद्यालये/संस्था/विभाग यांनी व्याख्यानांचे आयोजन केले असेल तर त्याचा अहवाल सादर करण्यात यावा व या संदर्भात श्री. सुनिल महाजन, अध्यक्ष, संवाद यांचेकडे संपर्क साधण्यात यावा. (श्री. सुनिल महाजन यांचा भ्रमणध्वनी क्र. ९३७१०१०४३२ व ई–मेल आय.डी. samwad.pune@gmail.com असा आहे)

मुंबई – ४०० ०३२.
दि. ०८ डिसेंबर, २०२१

(सुधीर पुराणिक)
कुलसचिव

P.T.O.

# University of Mumbai

Phone - 022 – 2265 2816
E-mail - dy.registrar.tau@fort.mu.ac.in
ar.tau@fort.mu.ac.in

Academic Appointments & Quality Assurance ( AAQA )
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32

NAAC Accredited with A++



प्रति,

मुंबई विद्यापीठाचे सर्व संलग्नित/मान्यताप्राप्त महाविद्यालये/संस्थाचे प्राचार्य/संचालक, विविध विभागांचे संचालक/विभागप्रमुख, प्रभारी संचालक, ज्ञान स्त्रोत केंद्र (ग्रंथालय), प्राचार्य, सर ज.जी स्थापत्यशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, आदर्श महाविद्यालय, तळेरे/अंबावडे, प्रभारी संचालक/समन्वयक रत्नागिरी, कल्याण आणि ठाणे उपपरिसर, परीक्षा नियंत्रक, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे/कक्षांचे प्रमुख.

अ) प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता रवाना :–

१. विविध शाखांचे अधिष्ठाता,
२. विभाग प्रमुख, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी,
३. मा. वित्त व लेखा अधिकारी
४. प्रभारी संचालक, विद्यापीठ संगणकीय केंद्र (युसीसी), मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी,
५. उपकुलसचिव, संशोधन प्रशासन व प्रोत्साहन विभाग (RAPC), मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी,
६. उपकुलसचिव, विद्याविषयक प्राधिकरणे, बैठका व सेवा विभाग (AAMS), मुंबई विद्यापीठ, फोर्ट,
८. स्वीय सहायक : १) कुलगुरु २) प्र–कुलगुरु ३) कुलसचिव

Reg/JD/2021-2526, dt- 4/12/2021


महाराष्ट्र शासन

शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)

महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत पुणे- ४११ ००१

Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२२११९/२६०५१५१२,२६१३०६२७,२६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११९५३


क्र.उशिसं/व्याख्यान/मवि-१/२०२१/93562 दिनांक- /११/२०२१

-2 DEC 2021

प्रति,

कुलसचिव,

सर्व अकृषी विद्यापीठे

महाराष्ट्र राज्य.

**विषय: लेखक, स्तंभलेखक, विचारवंत, राजनितीतज्ञ व भारत सरकारच्या विविध प्रशासन सेवेत काम केलेले अधिकारी श्री. ज्ञानेश्वर मुळे यांचे महाराष्ट्रातील विविध जिल्हयात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानाचे आयोजन करणे संदर्भात..**

संदर्भ: मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाकडून प्राप्त पत्र क्र.: मंत्री/उ.व तं.शि./व्ही.आय.पी./११६६/२०२१ दि. ५.१०.२०२१

उपरोक्त विषयाबाबत संदर्भांकित क्रमांकान्वये अध्यक्ष, संवाद- पुणे यांचे पत्र क्र. निरंक दि. ५.१०.२०२१ या संचालनालयास प्राप्त झाले आहे.

श्री. ज्ञानेश्वर मुळे यांच्या माती-पंख-आकाश या पुस्तकास, गुजरात साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्यानिमीत्त पुणे येथे झालेल्या सत्कार समारंभाच्या कार्यक्रमामध्ये मा. मंत्री महोदयांनी श्री. ज्ञानेश्वर मुळे यांचे व्याख्यान महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयात आयोजित केले जावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

यु.पी.एस.सी. व एम.पी.एस.सी. साठी अभ्यास करणा-या तसेच परराष्ट्र सेवेत येऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांना श्री. ज्ञानेश्वर मुळे यांच्या पुस्तकाचा व व्याख्यानाचा लाभ मिळण्यास्तव योग्य ती कार्यवाही महाविद्यालयीन स्तरावर करण्यात यावी याबाबत आपल्या कार्यकक्षेतील सर्व संलग्नित महाविद्यालयांना सूचित करण्यात यावे. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करण्यात यावा.

महाविद्यालयांनी व्याख्यानाचे आयोजन केले असेल तर त्याचा अहवाल देण्यात यावा या संदर्भात श्री. सुनिल महाजन- अध्यक्ष, संवाद यांचेकडे संपर्क साधण्यात यावा. श्री. सुनिल महाजन यांचा भ्रमणध्वनी क्र. ९३७१०१०४३२ व ई-मेल आय.डी. samwad.pune@gmail.com असा आहे.

(डॉ. धनराज माने)

शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,

महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१.

Regi प्रत माहितीस्तव -

१. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०००३२.

२. श्री. सुनिल महाजन- अध्यक्ष, संवाद, पुणे.